महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१

www.dvet.gov.in ;desk८@dvet.gov.in ;०२२-२२६२०६०४/२९३

पत्र क्रमांक- ०८/व्हिओसी/मान्यता/२०२२/ ३७६ दिनांक :- १३ मे, २०२२

**ईमेलव्दारे/महत्त्वाचे**

प्रति,

सहसंचालक,

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,

प्रादेशिक कार्यालय,

मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय:- पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम व +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम संदर्भातील प्रस्तावाबाबत.

संदर्भ:-

१. शासन निर्णय क्र.व्हिओसी-२०१७/प्र.क्र.१५७/व्यशि-४ दि.१०.०५.२०१८
२. संचालनालयाचे पत्र क्रमांक ०८/व्हिओसी/NSQF/२०२१/११० दि.३०.१२.२०२१
३. संचालनालयाचे पत्र क्रमांक ०८/व्हिओसी/NSQF/२०२१/२५ दि.१३.०४.२०२२
४. शासन पत्र क्रमांक व्हिओसी-२०२२/प्र.क्र.७५/कौशल्य-२ दि.२९.०४.२०२२

पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, +२ स्तरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नविन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विना अनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यांस परवानगी देण्यासाठीच्या ऑनलाईन प्रमाणित कार्यपध्दतीस विभागाच्या संदर्भाधीन क्र (३) येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने प्रत्येक शैक्षणिक वर्षात मान्यतेबाबतची कार्यवाही करण्यात येते.

२. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ बाबत पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे. "संचालनालयास्तरावरुन पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम व +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम NSQF शी सुसंगत करण्याची कार्यवाही सुरु असल्याने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम व +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यासंदर्भात मान्यता देण्याबाबतचे कोणतेही प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाहीत".

तरी वरीलप्रमाणे आवश्यक सूचना सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालये, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तांत्रिक विद्यालये व सर्व संबंधितांना आपल्या स्तरावरुन तातडीने निर्गमित करण्यात यावी.

(दि.अं.दळवी)
संचालक

e:\pk\data 2022\pk- ro letter 2022.docx